# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०९/२०२४ (शनिवार) दुपार**

---

## अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दि. २०/०९/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, केळवद हद्दीत मौजा सावळी फाटा येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून मौजा सावळी फाटा येथे नाकाबंदी केली असता **आरोपी नामे– गितेश्वर मुरलिधर भरने, वय ५२ वर्ष रा. हेगरे ले आउट कोराडी** याने त्याचे ताब्यातील ट्रक दहा चक्का एम एच–४०/बी. जी– ६३१५ मध्ये दोन ब्रास वाळु ही अवैध्यरित्या विना रॉयल्टी रेतीची वाहतुक करताना मिळुन आल्याने घटनास्थळावरून एक अशोक लिलॅन्ड कंपनीचा पिळया रंगाचा ट्रक दहा चक्का एम एच– ४०/बी.जी– ६३१५ असे नमुद असलेला किंमती अंदाजे २०,००,०००/–रू. तसेच व ज्यामध्ये क्षमतेपेक्षा दोन ब्रास वाळु किं. १२०००/– असलेली असा एकुण २०,१२,०००/– रु. चा मुद्देमाल अवैध्यरित्या विनापरवाना रेती चोरीचे गौणखनिज वाहतुक करतांना मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे. **आरोपी चालक १) गितेश्वर मुरलिधर भरने वय ५२ वर्ष रा. हेगरे ले आउट कोराडी व मालक नामे– सुधाकर डाखोळे रा. झिंगाबाई टाकळी नागपुर** यांचेविरूद्ध पोस्टे केळवद येथे कलम ३०३ (२), ४९ भा. न्या. सं सहकलम ४८ (८) जमिन महसुल अधिनियम १९६६ सहकलम–३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधिनियम, सहकलम–४/२१ खान खनिज अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी चालक यास अटक केली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे केळवद येथील ठाणेदार सपोनि अनिल राउत यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

## अकस्मात मृत्यु

पोस्टे खापरखेडा अंतर्गत बिना संगम येथे **मृतक नामे– विशाल मधु सिरसाम व २२ वर्ष राहणार गुमथडा वार्ड क्रमांक ०३** हा मित्रासोबत दि. १९/०९/२०२४ रोजी बिना संगम येथे नदीचे पाण्यात आंघोळीला गेला व तो खोल पाण्यात गेला व नदीचे पाण्यात बुडाला. त्याचे प्रेत दि. २०/०९/२०२४ रोजी एस.डी.आर.पी.पथक नागपुर यांनी सदर प्रेताचा शोध मोहीम राबवुन सायंकाळी १९.०० वा मृतकाचा शोध लागल्याने सदरचे प्रेत फिर्यादीने ओळखले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विक्की मधुकर सिरसाम वय २२ वर्ष, राहणार वार्ड क्रमांक तीन गुमथळा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे कलम १९४ बीएनएसएस अन्वये मर्ग नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर